**पोलीस आयुक्त, पुणे शहर यांचे कार्यालय,**
साधु वासवानी रोड, पोष्ट ऑफिसच्या जवळ, कॅम्प, पुणे - ४११ ००१.
दूरध्वनी क्र. : ०२०-२६१२ ५३९६ फॅक्स : ०२०-२६१२ ८१०५
ईमल आयडी : cp.pune@nic.in

जा.क्र/पोउपआ/वि.शा/पुणे शहर/ ४९५५/२०२४ दिनांक - १० /०४/२०२४

## अधिसुचना

### (फौजदारी दंड संहिता कलम १४४ अन्वये )

**ज्याअर्थी** आमचे असे निदर्शनास आले आहे की, तृतीयपंथीय व अशा प्रकारच्या लोकांचा गट हे एकट्याने किंवा गटाने शहराच्या ज्याठिकाणी लग्न, उत्सव, स्नेह संमेलन, धार्मिक कार्यक्रम किंवा ज्यांचे घरी जन्म अथवा मृत्यु झाला असेल अशा नागरीकांचे घराचा शोध घेऊन त्या ठिकाणी व परीसरात जातात,

**ज्याअर्थी** आमच्या असे निदर्शनास आले आहे की, तृतीयपंथीय व अशा प्रकारच्या लोकांना बोलावलेले नसताना देखील ते शहरातील विविध भागातील नागरीकांच्या घरी जातात आणि अश्लील व भितीदायक वर्तन करुन जबरदस्तीने पैशाची मागणी करतात, आणि

**ज्याअर्थी** जे लोक सणाच्या प्रसंगी किंवा इतर काही धार्मिक कार्यात किंवा कुटुंबातील मृत्युच्या प्रसंगात गुंतलेले असतात अशा वेळी त्यांना ते स्वेच्छेने देऊ इच्छित असलेल्या पैशापेक्षा त्यांच्या अशा धमकावणाऱ्या वर्तनामुळे जास्त पैसे देण्यास भाग पाडतात, आणि

**ज्याअर्थी** असे निदर्शनास आले आहे कि, तृतीयपंथीय व अशा प्रकारच्या लोकांचा गट हे ट्रॅफिक जंक्शन / गर्दीचे ठिकाण / चौक व शहरातील विविध ठिकाणी फिरतात आाणि वाहन धारकांना व मार्गाने येणारे - जाणारे इतर लोकांना पैसे देण्यास भाग पाडतात, आणि

**ज्याअर्थी** आमचे असे निदर्शनास आले आहे कि, त्यांचे असे कृत्य बेकायदेशीरपणे एकत्र येणे, खंडणी वसुल करणे, सार्वजनिक उपद्रव निर्माण करणे हे भारतीय दंड संहितेच्या वेगवेगळया कलमांतर्गत गुन्हा असुन सुध्दा तृतीयपंथीय व अशा प्रकारच्या लोकांच्या गटाविरुध्द त्यांच्या भितीमुळे लाजेमुळे सामान्य नागरीक / पिडीत नागरीक तक्रार करण्यास पुढे येत नाही, आणि

**त्याअर्थी** वरील बाबी लक्षात घेता, अशा प्रकारच्या उपद्रव किंवा संभाव्य धोक्याच्या घटनांना मोठ्या प्रमाणावर प्रतिबंध करणे आवश्यक आहे अशी माझी खात्री झाल्याने खालील प्रमाणे आदेश काढण्यात येत आहे.

१. तृतीयपंथीय व अशा प्रकारच्या इतर काही लोकांच्या गटांना याद्वारे शहरात एकट्याने किंवा एकत्रितपणे फिरुन आणि निवासस्थान / आस्थापना इत्यादी ठिकाणी ज्या कुटुंबात उत्सव / लग्न / अंत्यसंस्कार / जन्म / मृत्युचे प्रसंग असतील अशा घरांच्या / आस्थापनांच्या मालकांनी आमंत्रित केल्याशिवाय जाण्यास मनाई करण्यात येत आहे.

२. तृतीयपंथीय व अशा प्रकारच्या इतर काही लोकांच्या गटांना ट्रॅफिक जंक्शन / चौकात एकत्र येण्यास आणि वाहन चालक / रस्त्याने जाणाऱ्या लोकांकडुन पैसे वगैरे मागण्यास मनाई करण्यात येत आहे.

या आदेशाचे उल्लंघन केल्यास भादवि कलम १८८ तसेच कृत्य अनुरुप भादवि कलम १४३, १४४, १४७, १५९, २६८, ३८४, ३८५, ५०३, ५०४, ५०६ तसेच महाराष्ट्र पोलीस कायदा कलम ६७, ६८, १११, ११२ नुसार गुन्हा दाखल होण्यास पात्र राहतील.

सदरचे आदेशावर कोणाला आक्षेप असल्यास या ईमेल - **cp.pune@nic.in** किंवा पोलीस आयुक्त कार्यालय, पुणे शहर येथे पाठवावे. आक्षेपांची आवश्यकतेनुसार दखल घेतली जाईल.

सदर आदेश दिनांक - १२/०४/२०२४ चे ००.०१ ते दिनांक - ११/०५/२०२४ चे २४.०० वाजेपर्यंत लागु राहील.

हा आदेश दिनांक - १० /०४/२०२४ रोजी माझे सही शिक्क्यानिशी निर्गमित करण्यात आला आहे.

ठिकाण — पुणे शहर

शिक्का

**( अमितेश कुमार )**
पोलीस आयुक्त
पुणे शहर.

**प्रत सविनय सादर –**

१) अपर मुख्य सचिव गृहविभाग, महाराष्ट्र शासन, मुंबई.

२) पोलीस महासंचालक, म.राज्य, मुंबई.

३) आयुक्त व अपर पोलीस महासंचालक, राज्य गुप्तवार्ता विभाग,म.राज्य, मुंबई.

**प्रत सस्नेह अग्रेषित –**

१) विभागीय आयुक्त, पुणे शहर.

२) आयुक्त मं.न.पा पुणे शहर.

३) जिल्हा सत्र न्यायाधिश, पुणे.

४) जिल्हाधिकारी व जिल्हादंडाधिकारी, पुणे .

**प्रत योग्यत्या कार्यवाहीसाठी –**

१) पोलीस सह आयुक्त, पुणे शहर.

२) अपर पोलीस आयुक्त, (गुन्हे), पुणे शहर.

३) सर्व पोलीस उप आयुक्त / विभागीय सहायक पोलीस आयुक्त, पुणे शहर.

४) सर्व प्रभारी, पो.स्टे / शाखा, पुणे शहर.

सर्व पोलीस स्टेशनचे पोलीस अधिकारी यांनी सदर आदेशाचे प्रती महत्वाच्या ठिकाणी चिकटवण्यात याव्यात, ध्वनी क्षेपणाद्वारे किंवा अन्य मार्गाने प्रक्षेपित करुन योग्य ती प्रसिध्दी करावी. त्याबाबत योग्य त्या नोंदी अभिलेखावर ठेवाव्यात.

५) सहायक संचालक व वरीष्ठ पोलीस अभियोक्ता, पुणे शहर.

६) जिल्हा माहिती व प्रसिध्दी अधिकारी, पुणे .

७) माहिती अधिकारी पोलीस माहिती केंद्र, पुणे शहर.

या आदेशाचे स्थानिक वृत्तपत्रातुन केवळ बातमी म्हणुन प्रसिध्दी व्हावी अशी विनंती.